# थोर योशीया राजाने देवाच्या वचनाचे पालन केले

**प्रार्थना:** ''प्रिय प्रभू, कृपा तुझ्या वचनावर भरवंसा ठेवून त्याचा आदर करण्यास मुलांना साहाय्य कर.''

मुलांचे वय, गरजा आणि आध्यात्मिक वाढीची पातळी ह्यांना अनुरूप असे शैक्षणिक कार्यक्रम निवडा.

बालाक राजा योशीयाचा वृत्तांत सांगण्याची तयारी करा. वाचा 2 **इतिहास** 34:1-21 **व** 29-33. पवित्र शास्त्राचे आज्ञापालन करणे किती मौल्यवान आहे हे हा शास्त्रभाग सांगतो.



मोठ्या मुलाला वृत्तांत वाचायला किंवा सांगायला सांगा. मग पुढील प्रश्न विचारा (प्रत्येक प्रश्नाच्या पुढे उत्तरे दिली आहेत).

- योशीया राजाने खोट्या दैवतांच्या मूर्ती व उच्च स्थानांचे काय केले? (पाहा वचने 3-4)
- हिल्कीया याजकाला देवाचा नियमशास्त्राचा ग्रंथ कोठे सापडला? (वचन 15)
- राजाने देवाचे वचन वाचले आणि आपल्या लोकांनी अवज्ञा केल्याचे त्याला समजल्यावर त्याने झालेले दु:ख कसे व्यक्त केले? (वचन 19)
- देवाचे वचन ऐकल्यावर लोकांनी एक मताने काय करायचे ठर्राविले? (वचन 32)
- देवाच्या वचनाचे आज्ञापालन करण्यामध्ये लोकांनी आपल्या राजाचा आदर्श समोर ठेवला का? (पाहा वचन 33)

**कार्यकृती:**

- लहान मुलांसाठी: कोठेतरी पवित्र शास्त्र लपवून ठेवा आणि मुलांना ते शोधायला सांगा. मग मुलांना स्पष्ट करून सांगा की योशीया राजाच्या काळातही अगदी असेच घडले होते.
- मोठ्या मुलांसाठी (त्यांच्याकडे पवित्र शास्त्र असेल तर): त्यांना पुस्तकाचे नाव, अध्याय व वचन सांगून पवित्र शास्त्रातून तो संदर्भ लवकरात लवकर शोधायला सांगा. यामुळे त्यांना पवित्र शास्त्रात कोणत्या गोष्टी कोठे आहेत ते शोधून काढण्यास मदत होईल.

योशीया राजाच्या वृत्तांताचे नाट्यीकरण करा.

- मुख्य उपासनेच्या पुढाऱ्याशी चर्चा करून ही नाटिका मुलांना सादर करता यावी याची व्यवस्था करा.
- मोठ्या मुलांनी लहान मुलांकडून तयारी करून घ्यावी.
- मोठ्या मुलांनी किंवा प्रौढांनी योशीया, हिल्कीया व निवेदक ह्या भूमिका कराव्यात निवेदक वृत्तांताचा थोडक्यात सारांश तयार करून मुलांना त्यांचे संवाद पाठ करायला मदत करतो.
- लहान मुलांनी सेवक व लोक समुदायाची भूमिका करावी. सेवकांकडे टेबल वा खुर्चीवरील कागदांच्या खाली लपविलेले पुस्तक द्या. लोकांकडे वेदीसाठी दगडांचा ढीग, नाणी म्हणून छोटे खडे व एक लहानसा डबा द्या.

**निवेदक.** 2 इतिहास 34:1-21 मधून वृत्तांताचा पहिला भाग सांगून म्हणा, ‘‘योशीया राजा लोकांना काय सांगतो ते ऐका.’’

**योशीया.** ‘‘इस्राएलाचे जनहो, आपल्या मूर्तींनी आपण प्रभूला चिरडीस आणले आहे. तर त्या मूर्ती आपण नष्ट करू!’’

**लोक.** पाषाणाच्या वेद्या तोडून टाका.

**योशीया.** ‘‘आपण देवाच्या मंदिराची डागडुजी केली पाहिजे ह्या प्रचंड मोठ्या कामासाठी पैसे कोण देईल?’’

**लोक.** डब्यात ‘नाणी’ टाकून म्हणा, ‘‘मंदिराच्या डागडुजीसाठी आम्ही आमचे दान देतो!’’

**सेवक.** पैसे घेऊन मंदिराची दुरूस्ती करण्याचा अभिनय करा. पुस्तक शोधून ते हिल्कीयाला द्या.

**हिल्कीया.** ‘‘महाराज योशीया हे पाहा! आम्हाला मंदिरात काय सापडले बघा! हे देवाचे नियमशास्त्र आहे. आपण मात्र त्यात सांगितल्याप्रमाणे वागत नाही. आपण देवाचे आज्ञापालन केले नाही!’’

**राजा:** क्षणभर पुस्तकाकडे पाहा आणि म्हणा, ‘‘सर्व लोकांना एकत्र बोलवा! देव काय म्हणतो ते त्यांनी ऐकलेच पाहिजे. देवाच्या नियमशास्त्राचे आपल्याकडून आज्ञापालन झाले नाही म्हणून आपण त्याची क्षमा मागितली पाहिजे.’’

**लोक.** ‘‘आपण थोर राजे आहात! आम्ही तुमचाच आदर्श समोर ठेवून चालू!’’

**मोठे मूल वा प्रौढ व्यक्ती.** नाटिका संपल्यावर मदत करणाऱ्या प्रत्येकाचे आभार माना.

**प्रश्न.** मुलांनी हे नाट्यीकरण प्रौढांसाठी केले असेल तर वर दिलेले प्रश्न त्यांनी प्रौढांना विचारावेत

चित्र काढा. पवित्र शास्त्र आणि मुलांना ते उतरवून घ्यायला सांगा, मोठ्या मुलांना छातीशी पवित्र शास्त्र धरलेल्या मुलाचे चित्र काढता येईल.



- उपासनेच्या वेळी मुलांनी आपआपली चित्रे माणसांना दाखवावीत.
- चित्रावरून, आपण देवाच्या वचनावर कसे प्रेम आणि सतत त्याचाच विचार कसा करतो, हे समजते असे मुले स्पष्टीकरण करतील.

देवाने आपल्या लोकांचे आपल्या वचनाच्याद्वारे कसे मार्गदर्शन केले हे दाखविणारी इतर उदाहरणे मुलांनी सांगावीत.

**कविता** काही मुलांना स्तोत्र 119:1-2 व 9-11 ह्यातून एक वा दोन वचने म्हणायला सांगा.

देवाचे वचन आपल्याला कशी मदत करते याविषयी मोठ्या मुलांना कविता किंवा गीत लिहिण्यास सांगा.

लहान मुलांना 2 तीमथ्य 3:16 तर मोठ्या मुलांना 2 तीमथ्य 3:16-17 ही वचने पाठ करून घ्या.

**प्रार्थना:** ''प्रिय देवपित्या तुझे वचन आमचे मार्गदर्शन व सांत्वन करते. तुझे वचन आम्हाला समजावून सांग म्हणजे आम्ही त्याचे आज्ञापालन करून त्यामध्ये आनंद करू.''



Copyright 2003 © by Paul-Timothy. May be freely copied. Download from www.Paul-Timothy.net